-: अर्जाचा नमुना :-

विधी अधिकारी गट ब / विधी अधिकारी पदाकरिता अर्ज.

नियुक्तीचे इच्छूक ठिकाण:-

कार्यालयीन उपयोगासाठीः

१. अर्ज क्रमांक:-

२. अर्ज स्वीकारल्याचा दिनांक :-

३. अर्ज स्वीकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह):-

| |
|---|
| एका फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा. |

सूचनाः- अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत,

#अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत सुस्पष्ट समजेल अशा अक्षरात लिहावी.

* आवश्यक नसेल ते खोडावे,

## (अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. अर्जदाराचे संपूर्ण नांव:- | आडनाव | नाव | वडीलांचे / पतीचे नाव | |
| मराठीत | | | | |
| इंग्रजीत | | | | |
| कोणत्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे ते पद ( विधी अधिकारी गट - ब / विधी अधिकारी ) | | | | |
| २. पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोड सहः- | | | | |
| ३.कायमचा पत्ता पीनकोड सहः- | | | | |
| ४. दूरध्वनी क्रमांक :- | लॅन्डलाईन | भ्रमणध्वनी | | |
| | e-mail address | | | |
| ५. जन्म दिनांक :- | दिवस महिना वर्ष | जन्म स्थळ:- | | |
| ६. दिनांक. ०५.२०२६ रोजीचे वय :- | | वर्ष महिने दिवस | | |
| ७. लिंग :- | पुरुष / महिला | | | |
| ८. धर्म:- | जात :- | | | |
| ९. सध्याचे नेमणूकीचे ठिकाण :- | | | | |
| १०. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? | | होय | नाही | |

योग्य असेल तेथे ( ) अशी खूण करावी.

## (ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

### ११. शैक्षणिक अर्हताः-

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विद्यालय / महाविद्यालय) | बोर्ड /विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेले टककेवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) अथवा जुनी ११ वी परीक्षा. | | | | | |
| २. उच्च माध्यामिक शालान्त परीक्षा (इ.१२ वी) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |

१२. इतर शैक्षणिक अर्हता:-

संगणक प्रशिक्षित आहे काय? होय नाही.

१३. अर्जदाराची इतर माहिती:-

(अ) सनद घेतल्याचा दिनांक:-

(ब) उमेदवाराने स्वतः हाताळलेल्या केसेसचा तपशील:-

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | केसेसचा प्रकार | केसेसची संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

टीप:- वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१३-अ. अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात /स्थानबध्द करण्यात /बध्द करण्यात / दंड करण्यात / सिध्दोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना / निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किया नाही अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून संस्थेकडून कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय / काढून टाकण्यात आले आहे काय ? होय /नाही

१३- ब हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याह शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय? होय/नाही

(१३-अ किंवा १३- ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादींचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणाचे स्वरुप स्पष्ट करावे.)

## -: अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र :-

मी, श्री/ सौ./ कु. ---------------------------- याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच, मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन. ठिकाण

दिनांक

अर्जदाराची सही
नांव व दिनांकासह

सोबतः- अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.

पोलीस अधीक्षक ,(नागपूर ग्रामीण ) नागपूर, वर्धा , चंद्रपूर , भंडारा यांच्या कार्यालयाकरीता विधी अधिकारी गट ब यांची ०४ पदे आणि विधी अधिकारी यांची १९ पदे कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत त्याकरीता ,विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

## सुचना-

उमेदव्राराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात घालून उजव्या बाजूला ठळक अक्षरात "**विधी अधिकारी गट ब आणि विधी अधिकारी जागेसाठी** अर्ज" स्वतंत्र लिफाफ्यावर नमुद करुन दिनांक ३१.०५.२०२६ पर्यंत विशेष पोलीस महानिरीक्षक , नागपूर परिक्षेत्र नागपूर सदर पोलीस स्टेशन जवळ , सिव्हल लाईन्स , नागपूर ४४०००१, या पत्त्यावर वर पोहचेल याची दक्षता घेवून विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा. दिनांक ३१.०५.२०२६ नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत पत्र व्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत व आवेदन अर्जामध्ये ई-मेल आयडी नमूद करणे आवश्यक आहे.

टीप-'वर दर्शविलेले पद रद्द करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिका-यास राहतील.

## कराराातील मासिक देय रक्कम :-

शासन निर्णय, गृहविभाग, क्र. डीपीपी-२०१४/प्र.क्र.०७/पोल-१० दि.२१.०८.२०१८ मध्ये विहित केल्याप्रमाणे विधी अधिकारी गट ब या पदाकरीता मासिक मानधन देय रक्कम रु.२५,०००/- दूरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रु.३,०००/- असे एकूण रु.२८,०००/-दरमहा देय राहतील आणि विधी अधिकारी या पदाकरिता मासिक मानधन देय रक्कम रु.२०,०००/-+ दूरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रु.३,०००/-असे एकूण रु.२३,०००/- दरमहा देय राहतील (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

शैक्षणिक अर्हता वयोमर्यादा/अनुभव

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायदयाचा पदवीधर असेल, तो सनदधारक असेल.

२. शासन निर्णय, गृहविभाग, एसपीपी-२००५/प्र.क्र.२४७/पोल-१०, दि.१५.९.२००६ नुसार, विधी अधिकारी, गट -ब व विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

३. उमेदवारास संबंधित पदाच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे परिपूर्ण ज्ञान असेल आणि तो संबंधित कायद्याचे प्रशिक्षण देण्यास सक्षम असेल.

४. उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

५. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६. शासन निर्णय, गृहविभाग, एसपीपी-२००५/प्र.क्र.२४७/पोल-१०, दि.२६.६.२००७ नुसार विधी अधिकारी ( गट ब ) व विधी अधिकारी पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ६० वर्षापेक्षा जास्त नसेल.

किंवा

७. जी व्यक्ती शासकिय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होतो आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकिय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल, सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकिय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल,

## विधीं अधिकाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-

१. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे,

२. सेवाविषयक / प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे,

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्याच्या मदतीने तयार करणे.

४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणें.

अटी व शर्तीः

१. सदर पदाची नेमणूक ही पुर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल. या अधिकारी/कर्मचाऱ्याना शासकिय अधिकारी/कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२. सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथम ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि अशी मुदत वाढविताना एका वेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्चः नियुक्ती करणे आवश्यक आहे असे, सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्चः निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल,

३. उमेदवाराची निवड करतांना प्रथम ५० गुणांची लेखी परीक्षा व २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल. लेखी व तोंडी परीक्षेत प्राप्त गुण एकत्रित करुन एकुण गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने नेमणुकीसंबंधी कार्यवाही करण्यात येईल. तसेच, नियुक्ती देण्यासाठी कमीत कमी ६० टक्के गुण असणे आवश्यक राहील.

४. निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यावसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याची लेखी परवानगीशिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा अर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. लेखी परीक्षेचा दिनांक व लेखी परीक्षेचे केंद्र ई-मेलद्वारे अवगत करण्यात येईल.

६. लेखी परीक्षा झाल्यानंतर लेखी परीक्षेमध्ये ३० गुण किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक व मुलाखत ज्या ठिकाणी होईल, त्याबाबतचे ठिकाण उमेदवारांना ई-मेल द्वारे कळविण्यात येईल,

७. उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

८. नियुक्त केलेल्या उमेदवारास दि.१५.९.२००६ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट ब नुसार करारनामा (Agreement) करणे अनिवार्य राहील.

- ***** -